# महाराष्ट्र शासन


शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव.

तळ मजला,शासकीय महिला रुग्णालय इमारत, मोहाडी रोड, जळगांव.

Email- ghmcjalgaon@gmail.com


जा.क्र.शाहोमज/कटरर्स दरपत्रक/लेखा/२०२३-२४ 11 दिनांक. 26 SEP 2023

प्रति,

वेब साईट वर
प्रसीध्द करणे बाबत.

विषय - या महाविद्यालयामार्फत आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेत सहभागी खेळाडु तसेच अनुषंगीक अधिकारी/कर्मचारी यांची चहा/नाश्ता/जेवन/पिण्याचे पाणी इत्यादी व्यवस्था करण्याकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, या महाविद्यालयामार्फत आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेत सहभागी खेळाडु तसेच अनुषंगीक अधिकारी/कर्मचारी यांची दिनांक.१२ ते १४ आक्टोबर,२०२३ या कालावधीत चहा/नाश्ता/जेवन/पिण्याचे पाणी इत्यादी व्यवस्था करण्याकरीता सोबतच्या तपशिलाप्रमाणे आपण आपले दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये विहित कालावधीत खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन राहुन खलील तपशीलाप्रमाणे राहून सादर करावे.

१.

| अ.क्र. | दरपत्रक सादर करण्याचा तपशील | किंमत (प्रति व्यक्ती) |
|---|---|---|
| ०१ | चहा - सकाळी/संध्याकाळी तसेच आवश्यकतेनुसार (चहा सोबत छोटे बिस्कीट पॅकेट)<br>नाश्ता - कोणता नाश्ता देणार या बाबत दरपत्रकामध्ये स्पष्ट उल्लेख करावा.<br>जेवन - चपाती, २ भाजी, दाळ, भात, पापड, काकडी, कांदा, १ गोड पदार्थ (सदर जेवन अमर्यादित राहील तसेच भाज्या कुठल्या देणार याचा दरपत्रकामध्ये स्पष्ट उल्लेख करावा.) | |
| ०२ | पाण्याचे जार -प्रति २० लिटर, आवश्यक ठिकाणी ग्लास उपलब्ध करणे. | |

२.

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दिनांक-२६.०९.२०२३ ते ०६.१०.२०२३ (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय व स्थानिक सुटटीचे दिवस वगळून ( सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ) |
| २ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक -०७.१०.२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. |
| ३ | दरत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, तळ मजला, शासकीय महिला रुग्णालय इमारत, मोहाडी रोड,जळगांव. |

३.

## अटी व शर्ती

१. दिनांक-०६.१०.२०२३ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रकाच्या चहा/नाश्ता/जेवन/पिण्याचे पाणी पाकीटावर असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये. दरपत्रकामध्ये आवश्यक तेथे दिनांक व ठिकाण नमुद करावे.

४. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सुचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. (हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. **दरपत्रकासोबत GST नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व शॉप ॲक्ट किंवा उद्योग आधार नुतनी करणासहीत साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक राहील.**

८. देयकाच्या रकमेतुन शासन नियमातील तरतुदीनुसार GST/ Income Tax कपात करण्यात येईल. सदर टॅक्स मधुन सुट अनुज्ञेय असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

९. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

१०. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

११. यशस्वी दरपत्रक धारकास आहार पुरवठा स्व:खर्चाने करावा लागेल. यावावत ठिकाण स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

१२. शा.निर्णन उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बावतीत खरेदीच्या कोणत्याही टप्पावर अनियमितता /गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्यावाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. पुरवठा करण्यात येणाऱ्या चहा/नाश्ता/जेवन/पिण्याचे पाणी इत्यादिंची अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रतिनिधी यांचे कडुन गुणवत्ता तपासुन त्यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर सदर आहार ग्राहय समजण्यात येईल.

१४. आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रद्द केलेला धनादेश इ. देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१५. अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्दकरणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

१६. या कार्यालयाचे दरपत्रक सुचनेमध्ये दिलेल्या यादीतील तपशीलाप्रमाणे दरपत्रक सादर करणे अनिवार्य आहे.

(वैद्य अभिजीत अहिरे)
प्रभारी अधिष्ठाता
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय,जळगांव.

दरपत्रकासोबत जोडावयाचे कागदपत्रे

१) GST नोंदणी प्रमाणपत्र.
२) पॅन कार्ड
३) शॉप ॲक्ट परवाना किंवा उद्योग आधार
४) हमीपत्र -१ व हमीपत्र -२
5) Annexure -B

Annexure - B

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव.

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता,दुरध्ववी ई-मेल आयडीसहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | GST No. | |
| ५ | PAN No. | |
| ६ | शासनाचे /इतर कर | |
| ७ | सदर वस्तुंचा पुरवठा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ८ | हमी पत्र | |
| ९ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

हमीपत्र -१ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, जळगांव.

मी,............................ लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत शासकीय होमिओपॅथी महाविद्यालयामार्फत आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेत सहभागी खेळाडु तसेच अनुषंगीक अधिकारी/कर्मचारी यांची चहा/नाश्ता/जेवन/पिण्याचे पाणी इत्यादी व्यवस्था करण्याकरीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासहित

..........................................................................................................................

हमीपत्र-२ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद रुग्णालय, जळगांव.

मी ................................लेखी हमी देत आहे की, आपल्या शासकीय होमिओपॅथी महाविद्यालयामार्फत आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेत सहभागी खेळाडु तसेच अनुषंगीक अधिकारी/कर्मचारी यांची चहा/नाश्ता/जेवन/पिण्याचे पाणी इत्यादी व्यवस्था करण्याकरीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासहित